# प्रकरण तिसरे

# 'डी.बी. रत्नाकरांच्या कवितेतील हॉटेल विश्व'

- प्रस्तावना

१) 'हॉटेल माझा देश' विषयी.

२) हॉटेल विश्वाची उकल करणारी कविता.

३) हॉटेल कामगारांचे भावविश्व उकलणारी कविता.

४) प्रेमाचे आशयसूत्र मांडणारी कविता.

५) आत्मशोधाच्या जाणिवांचे आशयसूत्र मांडणारी कविता.

६) व्यक्तीचित्रणात्मक कविता.

७) व्यवस्थेविरूद्ध राग व्यक्त करणारी कविता.

८) देशाभिमान सांगणांरी कविता.

- समारोप
- संदर्भ सूची

-----

# प्रकरण तिसरे

## डी.बी. रत्नाकरांच्या कवितेतील 'हॉटेल विश्व'

**प्रस्तावना :**

साहित्य हा एकेकाळी गुलछबू, गुलहौशी लोकांनीच जोपासावयाचा छंद मानला जात होता. मात्र जगात अशी कोणतीही गोष्ट नित्य नसते. बदल हा सृष्टीचा नियम आहे. मग तो साहित्याच्याही बाबतीत लागू होतो. पारंपरिक साहित्याविषयी लोकांचा समज बदलला, लोकरंजनासाठी साहित्य हा समज मागे पडला. लोकशिक्षण लोकप्रबोधन यासाठी साहित्य निर्मिती होऊ लागली. साहित्याने माणसाला केंद्र केले. त्यामुळे माणसाच्या समाजाच्या सुख दु:खाचा वास्तव आलेख साहित्यातून मांडला जाऊ लागला.

डॉ. बाबासाहेबानी भारतीय राज्यघटना निर्माण करून भारतीय समाजाला स्वतंत्रतेची सनद मिळवून दिली. त्यामुळे उपेक्षित, वंचित वर्ग बोलू लागला. लिहू लागला. आपल्याला अनेक वर्षे अंधारात ठेवणाऱ्या, गुलामगिरी लादणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक व्यवस्थेविरोधी तो बोलू लागला. धर्मव्यवस्था, वर्णव्यवस्था यांच्यातील फसवेपणा निर्भयपणे व्यक्त करू लागला. यातूनच हे साहित्य सर्वहारा, सर्वव्यापी होत गेले. ते सर्वहारा माणसांचा विचार करू लागले. पारंपरिक मूल्य व्यवस्था नाकारली गेली व मानवतावादी मूल्यव्यवस्था निर्माण करणारे साहित्य निर्माण झाले. इथल्या पारंपरिक व्यवस्थेला नकार दिला व अखंड मानवतावादाला होकार देऊन जे साहित्य निर्माण झाले त्या निर्मितीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा होती. ही प्रेरणा घेऊन पुढे ज्या साहित्य प्रवाहाचा विस्तार झाला ते 'दलित साहित्य' म्हणून वाटचाल करू लागले.

१९६० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घेऊन लिहिणारे नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, यशवंत मनोहर, केशव मेश्राम, अरूण कांबळे, ज.वि. पवार, शरणकुमार लिंबाळे, दया पवार इ. कवींनी मराठी कवितेतील विद्रोहाची धार तेज केली आणि मराठी कवितेला एक नवा 'आयाम' मिळवून दिला. त्यांनी दलित साहित्याचे मराठीतले मोल काय आहे हे दाखवून दिले. त्यांनी कवितेच्या सौंदर्यस्थळांवर प्रेम केले नाही तर कवितेचे ओबडधोबड अक्रस्ताळ, आक्रमक रूप सुद्धा सामाजिक प्रबोधनासाठी उपयोगी ठरते हा सिद्धांत मांडून कवितेच्या पारंपरिक सौंदर्यशास्त्राला हादरा दिला. पारंपरिक सौंदर्यशास्त्राने या विद्रोही कवितेचे मूल्यमापन

केले जाऊ नये असा नि:संदिग्ध इशारा दिला. हाच आदर्श समोर ठेवून लेखन करणारे डी.बी. रत्नाकर हे तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे कवी आहेत.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात खऱ्या अर्थाने मराठी साहित्य मराठी जीवनाचे प्रतिनिधिक चित्रण करू लागले. याला ग्रामीण आणि दलित साहित्याने चालना दिली. आंबेडकरी चळवळीतून प्रेरणा घेऊन निर्माण झालेल्या दलित साहित्याने दलित जीवनाचे, त्यातील अस्पृश्यतेचे, दु:ख दैन्य आणि दारिद्रयाचे व विद्रोहाचे समर्थपणे चित्रण केले. त्यातही आवर्त निर्माण झाल्यासारखे वाटत होते. मात्र नव्या पिढीतील हे लेखक नवनव्या वाटा चोखाळीत होते. या दृष्टीने डी.बी. रत्नाकर यांचा 'हॉटेल माझा देश' हा कवितासंग्रह उल्लेखनिय आहे.

**'हॉटेल माझा देश' विषयी :**

'हॉटेल माझा देश' हा सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर यांनी प्रकाशित केलेला प्रा. धम्मपाल रत्नाकर यांचा पहिला कवितासंग्रह होय. नामदेव ढसाळ यांनी जसे या जगाला अपरिचित असणारे गोलपिठ्यातले जग सर्वासमोर आणले, तसेच कवी रत्नाकर यांनी हॉटेल लाईनचे जग सर्वांसमोर आणण्याचा मराठी साहित्यातील हा पहिलाच प्रयत्न केला आहे. धम्पाल रत्नाकरांनी हा जो प्रयत्न केलेला आहे त्यामुळे हॉटेलचे सर्वच पैलू उघडे झाले आहेत, असे मात्र मुळीच म्हणता येणार नाही. अजून देखिल या हॉटेल विश्वात खूप काही सांगण्यासारखे आहे. तरीही रत्नाकरांचा हा प्रयत्न स्तुत्यच मानावयास हवा.

हॉटेल लाईनवर विचार करत असताना या अगोदर समाजशास्त्रीय दृष्ट्या कामगार जीवनावर थोडेफार लिहिले गेलेले आहे. ललित वाङ्मयाचा विचार केल्यास विजय तेंडूलकर यांनी संपादित केलेल्या 'समाजवेध' या पुस्तकात प्रिया तेंडूलकर यांचा 'पंचतारांकित' असा एक लेख आहे. त्यात पंचतारांकित हॉटेलमधील श्रीमंती व या श्रीमंतीची श्रीमंत दु:खे यावर प्रिया तेंडूलकर यांनी प्रकाश टाकला आहे. मात्र 'हॉटेल माझा देश' हा हॉटेलमधील अनुभवाचा प्रातिनिधिक काव्यसंग्रह आहे. 'हॉटेल माझा देश' मधील कविता ही दलित जाणिवेच्या पलिकडे जाऊन मानवी दु:खांचा वेध घेते. म्हणून तिला पारंपरिक निकष लावून तपासता येणार नाही.

रत्नाकरांचा हा पहिलाच कविता संग्रह असला तरी त्यात नवखेपणाच्या खुणा कुठेच आढळत नाहीत. हे या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. दुसरे वैशिष्ट्य असे की, स्वत: दलित असूनही पहिलाच कवितासंग्रह दलितत्वाच्या जाणिवेपलिकडे

लिहावा हे होय. या दृष्टीने या संग्रहाची अर्पणपत्रिका खूपच बोलकी आहे. रत्नाकरांनी हा आपला कविता संग्रह हॉटेलातील कामगारांच्या दु:ख, वेदना आणि अगतिकतेला अर्पण केला आहे. क्रांतीबा फुल्यांनी आपला 'गुलामगीरी' हा ग्रंथ अमेरिकेतील निग्रोच्या उत्थापनासाठी काम करणाऱ्यांना अर्पण केलेला आहे. हाच फुले-आंबेडकरांचा वैचारिक वारसा रत्नाकर प्रामाणिकपणे पुढे चालवत आहेत असे म्हणणे अतिशयोक्त होणार नाही. अशा या वैशिष्ट्यपूर्ण कवितासंग्रहाचा अभ्यास करत असताना अभ्यासाची सोय म्हणून या संग्रहातील कवितांचे वर्गीकरण केलेले आहे. ते खालीलप्रमाणे-

१) हॉटेल विश्वाची उकल करणारी कविता.

२) हॉटेल कामगारांचे भावविश्व उलघडणारी कविता.

३) प्रेमाचे आशयसूत्र मांडणारी कविता.

४) आत्मशोधाच्या जाणिवांचे आशयसूत्र मांडणारी कविता.

५) व्यक्तीचित्रणात्मक कविता.

६) व्यवस्थेविरोधी राग व्यक्त करणारी कविता.

७) देशाभिमान सांगणारी कविता.

वरील प्रमाणे वर्गीकरण केल्यानंतर आता प्रत्यक्ष या कवितासंग्रहातील कवितेच्या आशयसूत्रांचा अभ्यास करता येईल.

### १) हॉटेल विश्वाची उकल करणारी कविता :

घरंदाज गरिबी असलेले, अनाथ, घरातून पळून आलेले, बाई आणि बाटलीच्यानादात बर्बाद झालेले, शिक्षण घेत काम करणारे, कितीतरी प्रकारचे लोक हॉटेलात काम करतात. ज्यांना आई नाही, बाप नाही अशी कपड्याविना अन्नाविना, रस्त्याच्या फूटपाथवरून फिरणारे, खून करणारे दादागिरी करणारे, गुंडगिरी करणारे, अनेक जातीचे, धर्माचे, पंथाचे लोक हॉटेलमध्ये पोट जाळण्यासाठी येतात. तेव्हा हॉटेलला नसतो जात आणि धर्म, कवी रत्नाकर म्हणतात,

''हॉटेल दिलदार<br>
त्यांना स्वीकारत<br>
अन्नही भरवतं

सहारा देतं

मायबाप होऊन

जिसका कोई नाही होता

उसका तो हॉटेल होता है....''[१] - (जिसका कोई नही होता....)

ज्याच कोणही नाही अशांसाठी हॉटेल हा सहारा असते. तिथे राहता येते, खाता येते. काही काळासाठी का असेना आपले दु:ख विसरता येते. म्हणूनच या सर्वांना हॉटेल हे आपले वाटते. म्हणूनच कवी या हॉटेलच्या आद्य संकल्पकाला निर्मात्याला प्रमाण करतो. कारण त्याने हॉटेलची निर्मिती केली नसती तर हजारो अनाथ, फुटपाथवरील, अनवाणी, बेघर यांना आश्रय मिळाला नसता. म्हणूनच कवी हॉटेलला विनंती करतो आहे, गड्या तू आता रूसू नको. तुला चांगले दिवस येणार हे नक्की आहे. तुझा कोण जन्मदाता आहे तो मला ठाऊक नाही. तरी पण,

''मी त्याला प्रणाम करतो

त्याला का ...... ?

अरे त्याच्यामुळे तू जन्मलास

तू जगलास

तुझ्यामुळे मी

माझ्यासारखे अनेक..... अनेक.''[२] - (प्रणाम)

अशा या अनेकांना आश्रय देणाऱ्या हॉटेलने कवी रत्नाकरांना सुद्धा आश्रय दिलेला आहे. यळगूडसारख्या खेड्यातून प्रतिकूल परीस्थितीतून शिक्षणासाठी कवी जेव्हा शहरात येतो तेव्हा या हॉटेलनेच त्यांना आपलेसे केलेले आहे. कवीने हॉटेललाच आपले सर्वस्व मानलेले आहे. आपली सुख, दु:खे या हॉटेलबरोबरच वाटली. त्यामुळेच,

''मी तुझ्यावर कविता करतोय

हसतोस काय.....?

अरे..... खरंच सांगतोय

शेवटी तुझ्यावर तर कोण लिहिणार.... ?''[३] - (हॉटेल)

ज्याने आपल्याला आधार दिला, ज्याने अडचणीच्या काळात आपल्याला स्वीकारले त्या हॉटेलसंबंधीची कृतज्ञता कवी हॉटेलवर कविता लिहून व्यक्त करू इच्छितो आहे. कवी आपल्या हॉटेल कुटुंबातील मित्रांना सांगतो की, अरे हॉटेलला शिव्या देऊ नका, त्याच्यावर रागावू नका, कारण त्यानेच आपल्याला उराशी धरले म्हणून आपण वाचलो. अन्यथा पडलो असतो कुठेतरी फुटपाथवर किंवा सामील व्हावे लागले असते एखाद्या गुंडाच्या ताफ्यात आणि राबावे लागले असते हप्तावसूलीसाठी. गड्यानो यापेक्षा आपले हॉटेल बरे की, त्याने आपल्याला या दलदलीपासून दूर ठेवले. घाम गाळायची सवय लावलेली आहे. तेव्हा.....

"ज्याने भाकरी दिली
त्याच्या विरूद्धच तक्रार"[४] – (तक्रार)

तुम्ही करू नका. कारण ज्या देशाला आपण आपला देश म्हणतो आहे, ज्या स्वातंत्र्यात आम्ही स्वतंत्र आहे असे म्हणतो आहे पण या देशाच्या स्वातंत्र्याने आपल्याला विश्वासाने जगण्याची सुद्धा हमी दिलेली नाही. मग या स्वतंत्र देशापेक्षा ज्याने आधार दिला ते हॉटेलच बरे नाही का ? हॉटेलमधील कामगार हा हॉटेललाच आपले सार सर्वस्व मानत असतो. म्हणूनच तो हॉटेलची स्वच्छता एखाद्या रूपवतीच्या 'मेकअप'सारखी ठेवत असतो. आपण कष्ट सोसत असतो. पण हॉटेलला मात्र तो नेहमी स्वच्छ ठेवतो. सुंदर तरुणीच्या मेकअपी गालाचा चावा घेतल्यावर जसा ठसा उमटतो, तसेच या स्वच्छतेवर गिऱ्हाईकाच्या पायाचे ठसे उमटत असतात.

"हॉटेलातील स्वच्छता
टापटीप...
गालावरच्या चकाकीसारखी
गाल चावल्यावर गालावर ठसे उमटावेत
निसंग दातांचे
तसे उमटतात.... गिऱ्हाईकांचे
हॉटेलभर....."[५] – (मेकअप)

म्हणूनच कवीला हॉटेलबद्दल आत्मियता वाटते. हॉटेलने मला आधार दिला. म्हणून हॉटेलचे माझ्यावर फार उपकार आहेत. प्रतिकूल स्थितीत हॉटेलने कवीला जिवदानच दिले नाहीतर कवीशी कौटुंबिक जिव्हाळ्याचे नाते जोडले. कवीला आपल्या कुटुंबातीलच एक मानले. कवी लिहितो,

''मी व्यक्तिगत असतो
तर......
स्वत:चा खून केला असता
म्हणूनच त्याचे आभार मानतोय
माझी व्यक्तिगतता संपविली म्हणून''[६] - (खून)

मी जर या आपमतलबी शहरात एकटा असतो तर आत्महत्याच करावी लागली असती, पण या बिकट समयी हॉटेलने आधाराचा हात दिला. मला समता शिकविली. त्यामुळेच माझी वैयक्तिकता नष्ट झाली आणि मी सर्वांचा विचार करू लागलो. याचे सारे श्रेय कवी हॉटेलला देतो. कवी रत्नाकर म्हणतात, सर्वच म्हणतात हॉटेल लाईन ही वाईट असते. मात्र कवीला ती वाईट वाटत नाही. ही लाईन खराब आहे, वाईट आहे. पण हे तसे गुळगुळीत वाक्य आहे असे कवीला वाटते. कारण आज हॉटेल लाईन वाईट म्हणून सोडून जाणारा उद्या पुन्हा हॉटेलमध्येच आलेला असतो. शेवटी हॉटेलच त्याचा आश्रयदाता असते.

''बाळंतपणासाठी बायको सोडावी
तशी हॉटेल लाईन सोडली
....... पुन्हा जवळ केली.''[७] - (पुन्हा हॉटेल)

या हॉटेल लाईनला कंटाळून कवी हॉटेल लाईन सोडतो. पण हॉटेल शिवाय आपल्याला कोण आधार देणार, तेव्हा पुन्हा हॉटेललाच जवळ करावे लागते. कवीला हॉटेलनेच नवे पंख दिले. कवीची वैयक्तिकता संपवून वैश्विक दृष्टि दिली. ते हॉटेलच आपल्याला आधार आहे. त्यामुळे काही दिवस जरी सोडले असले तरी पुन्हा तिथेच जावे लागलेले आहे. कारण अजून ध्येयपूर्ती झालेली नाही. हॉटेलचे रूप बदलने कवीला आनंददायी वाटते. साध्या इमारतीमधील हॉटेल आता ऐतिहासिक किल्ले आणि राजवाड्यात स्थलांतरीत

झाली आहेत. या ऐतिहासिक वास्तू आपल्या इतिहासाला उजाळा देणाऱ्या असतात. माणूस हाच इतिहासाचा वारसदार आहे. कवी उपरोधाने म्हणतो, 'जो इतिहास विसरतो तो इतिहास घडवू शकत नाही. हा इतिहास घडविताना माणसाचे माणूसपण अबादित राहिले पाहिजे.'

''अहो ज्याला इतिहास माहीत नाही
तो इतिहास घडवू शकत नाही'
मला इतिहास घडवायचा नाही
मग ?
मला माणसं घडवायची आहेत
मला माणसं जगवायची आहेत.....''[८] – (संवाद)

इतिहासाबरोबरच माणसाचेही मोल फार आहे. तो जगला पाहिजे कारण या माणसानेच पृथ्वीवर स्वर्ग निर्माण केलेला आहे. अशा या अन्नदात्या, आश्रयदात्या हॉटेलसंबंधी काही बरेवाईटसुद्धा कवीला सहन होत नाही. कारण हॉटेल हेच त्यांचे कुटुंब आहे. हॉटेलातील कामगार हे जिव्हाळ्याचे सगे सायरे आहेत. म्हणूनच कुठे हॉटेलला आग लागली कुठे हॉटेल लुटले, वेटरला मारहाण झाली तर कवीचे हृदय तळमळते. मी या जीवाभावाच्या हॉटेलची इज्जत वाचवू शकत नाही यांचे शल्य कवीला सलत राहते.

''मी ही होरपळतो
आगीत हॉटेल होरपळावं तसं....''[९] – (बातमी)

या हॉटेल संबंधी कवीची कृतज्ञतेची भावना आहे. ज्या हॉटेलने मला सांभाळले, सावरले, समतेचा धडा दिला त्या हॉटेलशी कवीचे कुटुंबातील एखाद्या घटकासारखे नाते आहे. कधी ते मैत्रीचे असते तर कधी अन्य प्रकारचे म्हणून कवी हॉटेल दोस्ताला म्हणतो,

''हॉटेल आणि मी
हाडामासाचे दोस्त
दोघांचा एकच विचार

जगण्याचा.......

जगविण्याचा.''[१०] -- (दोस्त)

हॉटेल आणि कवी यांची महत्त्वाची एकच भूमिका आहे. ती आपण जगत असताना दुसऱ्यांनाही जगविण्याची, इतरांच्या दु:खात भागीदार होण्याची. म्हणून हॉटेल आणि कवी हे विचारांच्या एकाच नाळेत बांधले गेलेत. त्यांचे नाते मैत्रीच्याही पलिकडचे आहे.

घरंदाज गरिबीला आसरा देण्याचे काम ज्या हॉटेलने केले. निराधाराला आधार दिला. ते हॉटेल कवीला सर्वस्व वाटत होते. म्हणूनच हॉटेलप्रती आभार व्यक्त करावे किंवा हॉटेलची उपकृतता शब्दांतून व्यक्त करावी म्हणून कवी हॉटेल देशावर लिहिताना दिसतो. हॉटेलला रत्नाकरांनी आपला देश मानले आहे. या हॉटेलच्या देशात राहणारे सारे कवीचे बांधव आहेत म्हणूनच हे सर्व एकमेकांच्या सुख, दु:खात सामील होतात. या देशाला 'नवा आकार' देण्याची कवी नवी प्रतिज्ञा करताना दिसतो. कारण या देशाला स्वातंत्र्य मिळाले ते सर्वसामान्य जनतेपर्यत, खेड्यापाड्यांपर्यंत, खेड्यापांड्यांच्या वेसीबाहेर पोहोचलेच नाही. ते या घटकांच्यापर्यंत पोहोचले नाही, म्हणून कवीच्या अंतरमनात उलघाल होते. या व्यवस्थेविरोधी चीड निर्माण होते. ही चीड अत्यंत संयमाने व्यक्त होते. कारण कवीला गौतम बुद्धांचा वारसा आहे. फुले-आंबेडकरी विचारांच्या पायावर कवीचे हे विचार उभे आहेत. म्हणून गौतमबुद्ध, म.फुले, डॉ. बाबासाहेब यांनी माणूस केंद्रिभूत मानून जसे विचार मांडले तसे रत्नाकरांच्या कवितेचा केंद्रबिंदू माणूस हाच आहे. म्हणून ही फुले-आंबेडकरी विचारांतून उगवलेली कविता सीमीत न राहता विस्तारीत होते.

## २) हॉटेल कामगारांचे भावविश्व उकलणारी कविता :

हॉटेल कामगारांचे भावविश्व हे व्यामिश्र स्वरूपाचे आहे. त्याची जटीलता समजून घेत असताना आपल्याला त्यांच्या सुख-दु:खाशी एकरूप व्हावे लागते. कवीने स्वत: हॉटेल कामगाराचे जगणे अनुभवलेले आहे. त्यामुळे या दु:खाची तीव्रता किती भयाणक आहे याची नेमकी तीव्रता कवी रत्नाकरांच्या शब्दांतून आलेली आहे. या हॉटैल विश्वातील कामगारांच्या दु:खाची जात वेगळी आहे. कारण विहीर खंदणाऱ्या अस्पृश्य कामगाराला विहिरीतले पाणी पिऊ दिले जात नाही. छान छान इमारती बांधणारा गवंडी झोपडीत राहतो. दिवसभर उन्हात राबून, घाम गाळून शेत पिकविणारा शेतकरी उपाशी मरतो. अगदी तसेच या हॉटेलमधील कामगारांचे आहे. हजारो

गिऱ्हाईकांची नित्य पोटे भरणारे हे कामगार रात्री आपणमात्र उपाशी किंवा अर्धपोटीच झोपतात. त्यांनी बनवलेले जेवण मुळात त्यांच्यासाठी नसतेच आणि असलेच तर त्यांच्या वाट्याला ते उरत नाही. म्हणजे स्वत: पिकवलेल्या अन्नाचा त्यांना आस्वाद घेता येत नाही. तसेच अनेक इतर बाबतीतही असते. इथे येणारा प्रत्येक तृप्त होऊन जातो. ज्याला जे हवे ते मिळते. प्रत्येकाचे काही ना काही थंड होत असते. पण काम करणारे मात्र अतृप्तच असतात. इथल्या प्रत्येकाचे स्वप्न भासांकित असते. प्रत्येकाच्याच चर्चेचे अतृप्त 'काटे' स्वप्नाळू डायलभोवती फिरत राहतात. आख्खे आयुष्यच डेडफोन सारखे होऊन जाते. प्रत्येक क्षण, प्रत्येक काम हे यंत्रवत असते. सकाळी उठल्यापासून संध्याकाळी झोपेपर्यंत कामगारात माणूस उरतच नाही. तर त्याचे यंत्र झालेले असते. त्याला भावना नसतात, मन नसते. कोणाला काय बोलायचे हे ठरलेले असते. Good evening Reception, What do you want Sir ?... Yes Sir..... No Sir.... इ. या पलिकडे त्याला स्वातंत्र्य नसते. कवी लिहितो,

''डेड फोनसारखं आयुष्य<br>
कम्पलेन्ट करूनही सुरु होत नाही<br>
मनाजोगं.....<br>
सगळं थंडावलयं.''[११] – (डेड फोन)

ही यंत्रवतता कामात, बोलण्यातच फक्त नसते, तर जेवण्यात झोपण्यात सुद्धा असते. हॉटेल कामगार हा बडीशेपच्या चघळून टाकलेल्या चोथ्यासारखा असतो. अनेकांना तृप्त करणारा हा कामगार स्वत: काय खातो याची चौकशी कधीच कोण करत नाही. येणारे आपापल्या पोटावर हात फिरवत सिगारेटेचा धूर सोडत जातात. तृप्तीचे ढेकर देतात व जाता जाता कामगारांना शिव्याही देऊन जातात. त्यांच्या सेवेची शिव्यांनी केलेली ही परतफेड असते. तरी कोणी काही बोलत नाही. शेवटी धंदा, मालक, गिऱ्हाईक सगळे विश्व गाढ निद्रेच्या अधीन असते. घोरत असते. तेव्हा कामगारांची जेवायची वेळ असते. जे काही उरले सुरलेले असते ते त्यांच्या वाट्याला आलेले असते. चामट चावता न येणारी रोजचीच रोटी, एक डाळ, एक भाजी, एक राईस प्लेट. त्यांच्या दातांनाही नेहमी तीच सवय असते. करपलेल्या रोटी सारखं कामगारांचे आयुष्य सुद्धा करपलेलेच आहे. त्यांची स्वप्ने करपलेली, बेचव आमटीच्या वाटीसारखी झालेली आहेत. इथे सुख तर नावाला नाहीच, दु:खाची तीव्रता भयंकर

आहे. त्याची जात निराळीच आहे. हे सगळे सहन करत कामगार हॉटेलशी एकनिष्ठ असतो. इतर जेव्हा मिठीतल्या आयत्या सुखाला घोळीत असतात तेव्हा कवी म्हणतो,

''आम्ही ही घोळत असतो
भूकेजल्या दाढेखाली
चामट शिळी रोटी
कधी तीही मिळत नाही
कसलं हे जीवन ?
कसले हे जेवण ? ''[१२]– (रोज....रोज)

असे हे दररोजच्या रूटीनचे जगणे, कधी मौज-मजा नाही. कधी चैन विलास नाही. तो करावा म्हटलेतर करता येत नाही. इथे आपल्या मनाला आणि शरीराला सुद्धा स्वातंत्र्य नाही. साधी अंघोळ करताना देखील योग्य वेळेतच करावी लागते. म्हणून हे जगणेच कवीला उघडे नाघडे वाटते. या जगण्याची लाज नाही. तोच साबण आणि तेच बाथरुम. इथले स्वातंत्र्य बाथरुमच्या चारभिंतीच्या आत असते. कवी म्हणतो हे उघडंनागडं जगण बघून बाथरुममधील ह्या ऐशोआरामी मार्बली भिंती हसतात. एका बाजूला ही मार्बली श्रीमंती, तिथे सर्व सुखे लोळत आहेत. तर दुसऱ्या बाजूला ह्या हॉटेल कामगारांचे अपमानीत, ओंगळवाणे जगणे म्हणजे बाथरुममधल्या साबणाच्या फेसासारखे असते. क्षणासाठी खूप शुभ्र दिसणारा हा फेस क्षणात शॉवरच्या पाण्याने विरघळून जातो आणि उरते ते पुन्हा वास्तव जगणे.

''निसरट लिरिल
मुर्दाडपणे फिरतो माझ्या अंगावरून
हातात फेस
डोळ्यात फेस
केसात फेस
जांघेत फेस
केसात फेस
........ फेसच फेस
शॉवर आपले काम करतो''[१३] – (उघडी अंघोळ)

असे हे कामगारांचे फेसाळ पोकळ जगणे असले तरी याही कामगारांना भावभावना आहेत. मात्र या भावभावनांचा कोंडमारा झालेला आहे. म्हणूनच त्या भावनांचा उद्रेक अनाहुतपणे होतो. या भावना साठून राहिलेल्या आहेत. त्यांचा निचरा होत नाही. अशावेळी माणसाच्या मनातील लैंगिक भावना जर कोंडून राहिली तर ती विकृतरूप धारण करते. हॉटेल जगतातील कामगारांना असे करून चालत नाही. मनात असले तरी मन मारावे लागते. डोळ्यांना दिसत असले तरी ते दिसत नाही असे दाखवावे लागते. अशावेळी हॉटेलमध्ये चुंबन घेत बसलेले जोडपे पाहिल्यावर या कामगारमनाची काय अवस्था होते ती कवी सांगतो.

''मांडीत मांडी घालून बसलेलं
जोडपं पाहिलं की
मांड्या खवळायच्या
वाटायचं
ताठलेली भावनाच
फेकून मारावी.''[१४] – (भावना)

या हॉटेल विश्वातील कामगारांना भावना नसतात. त्यांचे जगणेच भावनाशून्य असते. अस्तित्वहीन असते. तो फक्त कामगार असतो भावभावनेशिवाय. मात्र या भावनांना उद्दिपित करणारे एखादे दृश्य दिसले की या साचलेल्या, कोंढलेल्या भावनांचा उद्रेक होतो. जरी हा उद्रेक अटळ असला तरी निष्क्रिय असतो. कवी म्हणतो की, 'ताठलेली भावना' फेकून मारावी असे वाटते. ही ताठलेली भावनाच या कामगारांच्या मनाची अवस्था आपल्यासमोर मांडते. वास्तविक कामगार हा कामगार असतो. मग तो हुषार असो, सुंदर असो, त्यांने फक्त कठपुतळीसारखे मालकाच्या ऑर्डरप्रमाणे काम करायचे असते. घडणाऱ्या घटना फक्त पहायच्या असतात. त्यांना दृष्टि असून अंधळे व वाचा असून मुके रहावे लागते. घडणाऱ्या घटनांवर त्याने काही बोलायचे नसते.

हॉटेल आणि वेश्या यांचे घनिष्ठ नाते असते. इथे येणाऱ्या सुंदर सुंदर स्त्रिया, त्यांच्या मादक हालचाली, गिऱ्हाईकांबरोबरचे त्यांचे संबंध हे सर्व वेटरपासून मॅनेजरपर्यंतच्या चर्चेचा मालमसाला असतो. रात्री सर्वजण एकत्र आले की, या चर्चेला उधान येते. कोणत्या रूममध्ये काय काय घडले, कुठे कुणाची फाटकी ब्रेशर सापडली. इथून ते बाटलीपर्यंत सर्वच चर्चा चालू असते. त्यात एखादी सुंदर स्त्री सर्वांनाच

आवडलेली असते. मग सहजच वाटून जाते. 'साला या भिंगरीचा एकदा चान्स मिळायला हवा होता.'

''ज्युनिअर सिनिअर स्टफरूम
खुल्लम खुल्ला चर्चा केंद्र
बाई.... बाटली.... मटका मुख्य विषय
वेटर, रुमबॉय सांगतात
किचनवाले ऐकतात
दिवसभरातल्या बायका....
लफडी....
सेक्स.....''[१५] – (चर्चाकेंद्र)

सगळे एकत्र आल्यावर तेवढीच मोकळीक या कामगारांना चर्चा करण्यासाठी मिळते आणि मग एक एकाच्या मनातील भावनांचा निचरा होतो. अशा या कामगारांच्या बंदिस्त जगण्यातला चर्चा हा एक विरंगुळा असतो. कवी रत्नाकरांनी या कामगार जीवनाचे भावविश्व उलगडताना वास्तव आहे तसे मांडलेले आहे. हे वास्तव कोणताही आडपडदा न ठेवता समोर येते. म्हणून तर रत्नाकर हॉटेल कामगारांच्या भावभावना त्यांच्या सवयी, त्यांचे वर्तन, यांचे योग्य दिग्दर्शन करू शकले आहेत. हॉटेलमधील नैतिकता, अनैतिका कवी कोणताही संकोच न ठेवता सांगतो. स्टोअरकिपर आनंदाचे व शांताबाईचे शरीरसंबंध सांगतानाही कवी संकोच करत नाही. कारण हे हॉटेली वास्तव हे असेच आहे.

''सुटलेला कासोटा सगळं काही सांगत असतो''[१६] – (कासोटा)

या एकाच ओळीवरून हॉटेलमधील उघडे नागडे वास्तव समोर येते. हॉटेल कामगारांचे जीवनच सार्वजनिक असते. थोड्या चुकीसाठी गिऱ्हाईकांनी बोलावे, मालकाने शिव्या द्याव्या, कामगाराने मात्र हे कढ सोसत गप्प काम करावे. अशा या जगण्याचा कवीला राग येतो. पण तरीही ते जगावे लागते अगदी सार्वजनिक होऊन.

''सार्वजनिक संडास मुतारी सारखं
आमचं सार्वजनिक आयुष्य
कुणीबी यावं

भसाभसा हागावं

फळा फळा मुतावं''[१७] - (आयुष्य)

वास्तविक हॉटेल कामगाराला स्वतःचे असे आयुष्य नसतेच. कारण इथे फक्त बघ्याची भूमिका करावी लागते. मनात असून बोलता येत नाही. वाटत असून करता येत नाही. एक प्रकारची ही मानसिक कोंडी आहे. म्हणून स्वत:ला काहीही करता येत नसले तरी कामगारांचा मात्र योग्य वापर करून घेतात. त्यांच्या जगण्याला मूल्य आहे किंवा नाही याचा कोणीही विचार करत नाही. मनात येईल तेव्हा वापरावे असे हे सार्वजनिक मूल्यहीन अपमानित जगणेच हॉटेल विश्वातील अखंड कामगारांच्या वाट्याला आलेले आहे. या कामगारांचे जगणे कसे मातीमोल आहे याचे वास्तव चित्रण कवी रत्नाकरांनी या आपल्या कवितेतून केलेले आहे.

**३) प्रेमाचे आशयसूत्र मांडणारी कविता :**

'हॉटेल माझा देश'मध्ये प्रेमभावनेचे हळूवार चित्रण करणाऱ्याही काही कविता आहेत. प्रेम हा प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातलाच एक भाग असतो. प्रत्येकाला एकदा ना एकदा तरी या अवस्थेतून जावे लागते. मग तो कामगार असो वा महालात राहणारा असो. प्रेम कोणी कोणावर करावे याला बंधने नसतात. हॉटेलात काम करणाऱ्या कवीवर प्रेम करणारी प्रेयसी आहे. कवी आपल्या प्रेयसीला म्हणतो,

''तू एकदा हॉटेलात

भेटायला आली होतीस

केवढा आनंद झाला म्हणून सांगू

तू माझ्यावर प्रेम करतेस म्हणून नव्हे

हॉटेलात मला भेटायला आलीस म्हणून....''[१८] - (प्रेम)

तेव्हा सगळ्या हॉटेलने तारीफ केली होती. पण त्यानंतर मात्र तू आली नाहीस, कारण मी हॉटेलात काम करतो हे तूला समजले. म्हणूनच तू या प्रेमाला नकार दिला असणार. कवीने मात्र हॉटेलला सांगितले की, ती हॉटेलमध्ये मला भेटणार नाही. खरे आहे प्रेमाची सुद्धा एक जात असते. ते कोणावर करावे यांचे सर्वसामान्यपणे अडाखे ठरलेले असतात. कवी हा प्रेमात गुंतलेला आहे. रात्री कवी या गोष्टीचा विचार करतो तेव्हा, त्यांला प्रश्न पडतो की, खरोखर ती प्रेम तर करते ना ? या प्रश्नाने कवीची झोप उडालेली आहे. कवी रत्नाकरांच्या या संग्रहात संग्रहीत झालेल्या ज्या प्रेम कविता

आहेत त्यातून आपलेले प्रेम हे पूर्णत्वाकडे न जाता अपूर्णच राहिलेले आहे. म्हणून इथे विरह आहे. तसाच प्रेयसीने दाखविलेला प्रेमाचा देखावा आहे.

''अनेकांनी वापरुन वापरुन
गुळगुळीत झालेल्या बेसीन मधल्या
साबणासारखी तू
गुळगुळीत
मिळमिळीत
मी कैकदा हातात धरायचा प्रयत्न केला.''[१९] – (साबण)

असे हे कवीचे हातापर्यंत, ओठांपर्यंत आलेले प्रेम कायमसाठी न राहता काही कारणास्तव तुटलेले, विस्कटलेले आहे. कवी रत्नाकरांच्या प्रेमाचे वैशिष्ट्य हे की, या प्रेमाची सुरुवात ही प्रेयसीकडून झालेली आहे आणि शेवट न करताच अर्ध्यावरही तिनेच सोडलेले आहे. वास्तविक हे प्रेमच मुळात भावनिक आहे. त्याला वास्तव जगण्यातील संदर्भ नाहीत. भावनेच्या भरात, तात्पुरते आकर्षण म्हणून प्रेम करणारी ही प्रेयसी आहे. मात्र हे ही नाकारता येत नाही की, कवीकडून म्हणावा तेवढा प्रतिसाद मिळत नसावा, म्हणून सुद्धा या प्रेमात अपूरेपणा, तुटलेपणा आलेला असावा किंवा कवी हा गरीब हॉटेल कामगार आहे, म्हणूनही हा दुरावा असावा. पण या कवितेत येणारी प्रेयसी ही कवीला नेहमी उत्तेजित करताना दिसते. कवीला ती जवळ बोलावते पण कवीचा या सर्वच गोष्टींना नकार आहे. मात्र ती निघून गेल्यावर निर्माण होणाऱ्या भावनांचा गोंधळ कवी निसंकोचपणे मांडतो.

''झोपायचं ऱ्हाईना हुतं
झंपरात हात घालून
डोंगर हलवीत बसलो असतो तर... (?)''[२०] –(चान्स)

मनात निर्माण झालेली स्त्री सुखाची ओढ. ती पूर्ण होत नाही तेव्हा मनात जे कोलाहल माजते तेच विचारांच्या, भावनेच्या पातळीवर बाहेर पडते. अशावेळी मनात असा विचार येणे हे अपरिहार्यच आहे. कवीच्या वरील ओळी या अश्लील, भडक वाटत असल्या तरी, एका विशिष्ट स्थितीत मनाची झालेली अवस्था व्यक्त करण्यासाठी या ओळी येतात. त्या जाणूनबुजून येत नाहीत. त्या ओढून ताणून आणल्या जात नाहीत. तर त्यात सहजता आहे. त्या गरज म्हणूनच येतात. कवीच्या मनात निर्माण

झालेला भावनेचा कोंडमारा लक्षात घेता हे अश्लिल वाटत नाही. तो चावटपणाही वाटत नाही. तर त्याला अतृप्ततेचा गहिरा रंग मिळत जातो. जेव्हा ही अतृप्ततां वाढत जाते तेव्हा कवी त्याला जगण्याचे संदर्भ जोडतो, वास्तवाचा अर्थ देतो. हा वास्तवाचा अर्थ दिल्यानंतर हे प्रेम तात्पुरते वाटायला लागते. त्याबद्दल विश्वसनीयता वाटत नाही.

कवी हा हॉटेल कामगार आहे. म्हणून कदाचित आपण इतर मुलींच्याबरोबर कसे संबंध ठेवावे, जर तिला कळाले तर, आपली वास्तवता तिला समजली तर कदाचित ती आपल्याला सोडून देईल, ती आपल्या जवळ येणार नाही. या संकोचापोटी कवी मुलींच्या जवळ जात नाही.

''नजरेने बोलायचा तुझा प्रयत्न
पण.....
हॉटेलच्या अंधार कोठडीतला
मी नजर कैदी.....''[२१] - (नजरकैदी)

कवीच्या प्रेमात जे अपुरेपण जाणवते. त्याचे कारण कवी हा हॉटेलात काम करणारा कामगार आहे. एकतर कवीला हॉटेल सोडता येत नाही. त्यामुळे तिला फक्त नजरेने बघण्याशिवाय कवी काही करू शकत नाही. कवीला नेहमी हॉटेलच्या नजर कैदेत रहावे लागते आहे. आपल्या जसे मनात असते तसे सर्वच घडत नाही. तसे जर ते घडत असते तर ते प्रयत्नाशिवायही झाले असते. प्रत्येक प्रेमीकाने स्वत:च्या प्रेमाची एक जात निर्माण केलेले असते. ते कसे आणि कोणाबरोबर करावे हे ठरवलेले असते. याचा प्रत्यय कवीलाही आलेला आहे.

''हॉटेलात काम करतोय
तिला कळलं
थंड चहाच्या कपाखालून
बशी दूर व्हावी
तशी ती निघून गेली.''[२२] - (कप)

अलिकडे प्रेम हा सुद्धा प्रतिष्ठेचा विषय झालेला आहे. आपण कोणावर प्रेम करतो आहे यावर आपल्या मित्र मैत्रिणीच्यातील प्रतिष्ठा ठरत असते. म्हणून कवी हॉटेलात काम करतो हे समजल्याबरोबर ती कपाखालून बशी सरकावी तशी कवींपासून

दूर गेलेली आहे. कवीच्या प्रेमाला कधी विरहाचे दाट रंग मिळतात तर हेच प्रेम कधी कधी शृंगारीक पातळीवर जाते. तिचे प्रत्येक चुंबन कवीला मद्याच्या प्यालासारखे वाटते.

> "तुझ्या ओठाचे हर एक चुंबन
> मला.... डीएसपी लार्ज पेगसारखं वाटतं
> पेग पेग घ्यावेत
> त्या गतीने मी चुंबने घेतो
> तू पेगसारखी
> मला क्षणाक्षणाने पेटविणारी."[२३] – (नशा)

इथे जसा शृंगार आहे तशी अतृप्ततेतील हाव ही आहे. क्षणाक्षणाला पेटण्याची उत्कंठा आहे. एका तृषार्ताची झालेली ही अवस्था आहे. ज्याच्या गावालाच प्रेम कधी जात नाही त्याला जर प्रेयसी मिळाली तर त्याची प्राथमिक अवस्था काय असेल. अतृप्त मनाला तृप्त करत असताना जी भावावस्था असेल तीच कवी शब्दांतून व्यक्त करतो आहे. कधी कधी ती येते. कवीच्या दु:खी मनाला दिलासा मिळतो. आपलेपणाने कोणीतरी जवळ आल्याचे समाधान मिळते. दु:खाचा भार थोडा कमी होतो. या अधाशी अतृप्तजगाचा विसर पडतो आणि ती पूर्ण शरीरभर पसरत जाते. तिच्याही मनात आग पेटलेली असते.

> "फ्रायपॅन सारखा तुझा चेहरा
> आतल्या आगीनं तापलेला
> दु:खाच्या फ्रिजमधील माझं गोठीव मन
> तू वितळवलसं.....
> तू प्रसरणशील.....
> माझ्या शरीरभर पसरलीस"[२४] – (फ्रायपॅन)

इथेही ही शरीरभर पसरलेली सखी डाव अर्ध्यावर मोडून निघून गेलेली आहे. कवीची अवस्था कोळ्यासारखी झालेली आहे. पूर्ण ताकदीने आणि आशेने जाळे फेकावे व एकही मासोळी सापडू नये. अशावेळी जी निराशा येते. तशी कवीच्याही

वाट्याला सतत आलेली आहे. कवीच्या प्रेमात सतत कुठेतरी काहीतरी खटकल्यासारखे वाटते. पण कवी मात्र नेहमीच प्रामाणिक आहे.

> "हॉटेलच्या पोटात किचन हृदयात
> पीठ मळताना
> ती घड्याळाच्या ठोक्यासारखी दिसली"[२५] – (दिवस)

हॉटेलच्या या व्यस्त घामेजलेल्या जीवनात ती कवीला घड्याळ्याच्या ठोक्यासारखी भेटते. कवीमात्र तिच्याकडे बघण्याशिवाय काहीच करू शकत नाही. आणि शेवटी तिचा अवघडलेला निरोप ऐकावा लागतो. पुन्हा एक अपुरे-अधुरेपण कवीच्या वाट्याला येते. ह्या प्रेमातली प्रेयसी ही नेहमी स्वतःच पुढाकार घेताना दिसते. कवी मात्र वेळ मारुन नेतो. तर कधी तिला टाळण्याचा प्रयत्न करतो. कवीला प्रेम ही संकल्पना मान्य असली तरी परिस्थितीने काही बंधने घातलेली आहेत. म्हणूनच कवी म्हणतो,

> "मी तुझ्या संग झोपू शकत नाही
> ती हसली
> मी टर्कन फाटलो....."[२६] – (आय लव यू)

कवी हॉटेल कामगार असला तरी, ही प्रेयसी त्याच्यावर प्रेम करते. साऱ्या बंधनांना झुगारते, तू माझ्याविषयी, माझ्या हॉटेली जगण्याविषयी कधीच काही बोलली नाहीस, मला व माझ्यासंहित हॉटेललाही स्वीकारलेस. जिथे जिथे मी असेन तिथे तिथे तू आलीस, तेव्हा तूझं प्रेम समजलं, जगण्याचा अर्थ गवसला याची कबूली कवीने दिलेली आहे.

प्रेमापेक्षा कवी आपल्या कर्तव्याला जास्त महत्त्व देताना दिसतो, कारण जगताना येणाऱ्या समस्यांचे निराकरण प्रेम करणार नाही याची पूर्ण जाणीव कवी रत्नाकरांना आहे. म्हणून त्यांच्या या प्रेमाची गतच वेगळी आहे आणि हेच त्यांच्या प्रेमकवितेचे वैशिष्ट्य आहे.

### ४) आत्मशोधाच्या जाणिवांचे आशयसूत्र मांडणारी कविता:

जीवन जगताना नेहमीच आपल्याला तडजोड करावी लागते. तडजोडीशिवाय जगणे कठीण होते. येणाऱ्या परिस्थितीच्या कलाने आपण गेलो तर, पूर्ण नाही पण थोडेसे जगणे हे सुसहाय्य होते. हॉटेल लाईनमधील जगणे हे या सुसहाय्यतेच्या पलिकडे

गेलेले आहे. वास्तविक हे जगच अपमानाचे आहे. पावलापावलाला इथे अपमान पेरलेले आहेत. दृष्टी असून अंधळेपण स्वीकारावे लागते. भावना असून भावनाशून्य जगावे लागते. इथे फक्त डोळ्यांनी पहायचे असते. हातांनी काम करायचे असते. प्रतिक्रिया मात्र द्यायची नसते. असे हे मुके, बहिरे, अंधळे जीवन हॉटेल कामगाराला जगावे लागते. इथे हरघडी होणारा अपमान, मानहानी या कामगारांच्या इतकी अंगवळणी पडलेली असते की, अपमान म्हणजे काय हेच या कामगारांना सांगता येत नाही. असेच अपमानीत जगणे कवी ही जगलेला आहे. हे जगणे तमाम हॉटेल कामगारांचे आहे. हॉटेलमधील या अपमानीत जगण्याचे कटू अनुभव कवी रत्नाकरांनी या संग्रहात संग्रहीत केलेले आहेत. आणि ते आत्मपर कवितेतून आलेले आहेत.

''रेल्वे रुळावरून घसरावी
तसा हॉटेल लाईनमध्ये घसरलो
आणि पाण्यासारखा हॉटेलभर पसरलो
काऊंटर पासून
म्होरी पर्यंत
बिनलज्जी प्रवास केला''[२८] - (अपमान)

परिस्थितीच्या रेट्यात सापडलेला कवी जेव्हा हॉटेल लाईनमध्ये येतो, तेव्हा या हॉटेली जगण्यातील वास्तवता त्याला समजते. रेल्वे अचानक रुळावरून घसरावी तसेच अचानक या हॉटेल लाईनमध्ये आलेल्या कवीने हे सर्व सहन करत करतच काऊंटर पासून म्होरीपर्यंत प्रवास केला. हा काऊंटरपासून म्होरीपर्यंतचा प्रवास असंख्य अपमानानी, दु:खानी, यातनानी भरलेला होता. या इथल्या दु:खाची जात नेमकी सांगता येत नाही. अपमानाची इतकी सवय झालेली असते की, अपमान म्हणजे काय असतो हे ही सांगता येत नाही. हे जगणेच मुळात क्लेशदायक आहे. अशा या क्लेशदायक वातावरणात कवी हॉटेलात राहतो आहे. आपले कोणीतरी यावे, आपली चौकशी करावी असे कवीला वाटते. पण येणारे सगळे एखाद्या कैद्याला भेटायला यावे तसे येतात. आपले काम आटोपले की निघून जातात. यात माया, जिव्हाळ्याचा कोठेही लवलेश नसतो. मुळात कवी हॉटेलात काम करतो म्हणजे ते काम कमी दर्जाचे आहे असे त्यांचे मत असते.

"हॉटेलात मला भेटायला येणारे
तुरुंगात कैद्याला भेटायला यावे
तसे येतात....
कामापुरते मामा बनून
माझ्या हॉटेली चेहऱ्याकडे पाहतात."[२९] – (भेट)

कवीकडे येणारे सगळे कामसाधू असतात. कोणीही मायेने, आपुलकीने चौकशी करत नाही. कवीची तशी अपेक्षाही असते पण तसे घडत नाही. ते कवीच्या हॉटेली चेहऱ्याकडे बघून झटपट निघून जातात. काहीना कवीचे हॉटेलात काम करणे पसंत नाही तेव्हा कवी म्हणतो,

"माझं हॉटेलात काम करणं
अनेकांच्या पसंतीस उतरलं नाही
त्यांचं लाचार वागणं
माझ्या पसंतीस उतरलं नाही."[३०] – (पसंत)

काम कोणतेही असो ते कामच असते. त्यातून आपल्या गरजा भागत असतात, मग या कामाला काय म्हणून नावे ठेवायची ? म्हणूनच या प्रतिष्ठा जपणाऱ्यांचे लाचार वागणे कवीला पसंत नाही आणि शेवटी पसंती तरी काय असते ? असा कवीला प्रश्न पडतो. कवी श्रमाला प्रतिष्ठा देतो. त्यात भेद करणारांची निर्भत्सना करतो. याचे कारण असे आहे की,

"हॉटेलनं मला सावरलं
मी हॉटेलला कवटाळलं
दोघांचं अनामिक नातं
माझ्या प्रश्नांच ओझं
हॉटेलनं खांद्यावर घेतलं."[३१] – (प्रश्न)

कवीकडे येऊन कामापुरते आपले म्हणणाऱ्या, हॉटेलमध्ये काम करतो म्हणून तुच्छ लेखणाऱ्या या माणसांनी कधीच कवीला मानसिक आधार किंवा कोणत्याही प्रकारचा दिलासा दिलेला नाही. उलट कवी हॉटेलमध्ये काम करतो म्हणून नावे ठेवलेली आहेत. कवीला मात्र या हॉटेलनेच सावरलेले आहे. हॉटेलमध्ये राहिल्यानेच कवीचे

प्रश्न सुटलेले आहेत. म्हणून कवीला हॉटेल जवळचे आणि प्रिय वाटते. ते आपले कुटुंब वाटते. कारण कवीच्या सर्व समस्या या हॉटेलनेच सोडविलेल्या आहेत. त्या कोण्या माणसाने सोडविलेल्या नाहीत. हॉटेलात काम करत असताना आपले अनुभव कवीने शब्दबद्ध केलेले आहेत. हॉटेलमधील जबाबदारीचे काम किती दक्षतेने करावे लागते हे कवीने अनुभवले आहे. 'कॅशिअर' म्हणून काम करत असतानाचा अनुभव कवीने समर्थपणे शब्दबद्ध केलेला आहे.

''माझ्या समोर नाचत असतात
शंभर पन्नासच्या हजारो नोटा
बैठकीत बाई नाचल्यागत
नोटांचे पदर ओढून ओढून
मी थकतो......'' [३२] – (कॅशिअर)

इथे कवी काऊंटरवर आहे तोवर पैसेवाला असतो. शंभर पन्नासच्या नोटा जरी समोर नाचत असल्या तरी त्या आपल्या नाहीत याचे भान कवीला आहे. कवी कॅश पेड केलेल्या बिलासारखा आठ तास पगारी राजा असतो. आपल्याकडून काही चूक होऊ नये व आपल्या पगाराचे अबॉर्शन टळावे म्हणून कवी दक्ष असताना दिसतो.

पगाराचा दिवस म्हणजे हॉटेल कामगारांचा चैनीचा दिवस असतो. जरी हा दिवस चैनीचा असला तरी कवीसाठी हा दिवस चैनीचा ठरत नाही.

''चार खूषीत
चार ना खूषीत
ऑफिससमोर रांग
रांगेत मी
पण माझ्यात मी नसतो
मी पगारात असतो''[३३] – (सात तारीख)

सात तारखेचा दिवस संपला की, पुन्हा सात तारखेसाठी हॉटेलात मिसळावे लागते. कारण मिळणाऱ्या पगारात गरजा आणि खर्च यांचा मेळ लागत नाही हे वास्तव आहे. म्हणूनच कवी पुढच्या सात तारखेसाठी हॉटेलात मिसळतो. हॉटेलनेच सांभाळले हॉटेलनेच आधार दिला. पण या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी कवी हॉटेल सोडतो.

''बाळंतपणासाठी बायको सोडावी

तशी हॉटेललाईन सोडली

...... पुन्हा जवळ केली.''[३४] – (पुन्हा हॉटेल)

ज्या पद्धतीने हॉटेलने आपल्याला जवळ केले, आपल्या समस्या सोडविल्या, आधार दिला त्या प्रकारची ही बाह्य व्यवस्था नाही. हे सत्य कवीला समजते तेव्हा पुन्हा हॉटेल जवळ करावे लागते. धडस्याला पांगळी बनविणारी ही व्यवस्था कमकुवत असेल त्याला मागे फेकते. हॉटेल मात्र उच्चनिच्चता पाहत नाही. प्रत्येकाला ते सामावून घेत असते, आधार देत असते. जगायलाही शिकविते आणि जगवायलाही शिकविते. म्हणूनच हॉटेल सोडून निघालेला कवी पुन्हा हॉटेल जवळ करतो.

संकटाच्या वेळी माणूस खचून जातो, नव्याने उभारण्याचा प्रयत्न करतो. आपली सर्व शक्ती तो त्यासाठी वापरतो. आपले संकल्पित ध्येय गाठण्यासाठी त्यांची धडपड चाललेली असते. या धडपडीला जर यश मिळत नसेल तर, तो स्वत:लाच स्वत:पासून हरवून बसतो. कवी रत्नाकरांचेही असेच झालेले आहे.

''मुतारीच्या भांड्यातल्या डांबरगोळीसारखा

मी विरघळतोय

विष्ठेसारखा पाण्याबरोबर

खोल खोल खोल जातोय

माझ..... अस्तित्व... मी शोधतोय''[३५] (मी)

कवी ज्या गोष्टीसाठी अहोरात्र कष्ट घेतो आहे, हॉटेल लाईनमधील अनेक अपमान सहन करतो आहे ती गोष्ट ते ध्येय जेव्हा आपण गाठू शकत नाही तेव्हा कवीला आपल्या अस्तित्वाचीच शंका येऊ लागते. मी कोण ? मी कशासाठी जगतो आहे ? या सर्व प्रश्नांची उकल कवी करू पाहतो आहे. जगण्याच्या या कोलाहलात कवीला माणूस जोडायचा होता. त्याला घडवायचा होता. पण तो माणूसच भेटत नाही, तेव्हा कवी हताश होतो. स्वत:चाच अर्थ अजून स्वत:ला कळला नसल्याची प्रांजळ कबुली देतो. जेव्हा कवी आपल्या उद्देशापासून विचलित होतो तेव्हा मनात माजलेल्या काहूरांला कवीने शब्दरूपात व्यक्त केलेले आहे. प्रामाणिकपणे कष्ट करून हवे ते मिळत नाही. या हॉटेलात काम करणाऱ्याला देशात आणि देशातील माणसांत समता मिळेल का ? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. मग या व्यवस्थेविषयीच चीड निर्माण होते. ती व्यक्त

करावी तर आपले भविष्यच पुसले जाईल. या साऱ्या गोष्टींच्या वेदनेचा आविष्कार कवी समर्थ शब्दांत करतो. बोलता येत असून सुद्धा आपण बोलू शकत नाही. तेव्हा कवी स्वत:लाच 'ॲश ट्रे' ची उपमा देतो.

> ''मी ही एक ॲश ट्रे च
>
> दु:ख वेदनांचे तुकडे
>
> आतल्या आत विझवणारा
>
> अश्रुंचा अंधूक धूर ओकायलाही मुभा नसते.''[३६] -(ॲश-ट्रे)

सिगारेटचे जळके अर्धे तुकडे, धूर, आगीसंहित पोटात घेऊन जसा ॲश-ट्रे या यातना सोसत असतो तशीच स्थिती कवीची झालेली आहे. पोटाची आग विझवण्यासाठी भाकरीवरील भविष्य उडून जाईल म्हणून हे दु:ख, यातना, पावलो पावली डोळे फोडणारे अपमान सहन करावेच लागतात. सोसावेच लागतात. या विरोधीचा द्वेष मनात, पूर्ण शरीरातच उकळत, धुमसत असतो. तरी बाहेरमात्र येऊ देता येत नाही. ॲश-ट्रे सारखे आतल्या आतच धगधगत रहावे लागते. सोसावे लागतात अनावर झालेले कढ ॲश-ट्रे सारखेच.

या आत्मपर कवितांतून एक प्रकारचे कवीचे परिस्थितीशी झगडणेच शब्दबद्ध झालेले आहे. मानवता निर्माण करण्यासाठी निघालेल्या कवीला हॉटेलच बरे वाटते. कारण ते इतरांना जगवते व जगवायलाही शिकवते. कवीचे वैयक्तिकत्व संपवते. म्हणून माणसांपेक्षा कवीला हॉटेलच प्रिय वाटते. या आत्मपर कवितेतून व्यवस्थेविरोधी, मतलबीपणाविरोधी राग व्यक्त झालेला आहे. कोणताही पडदा न ठेवता कवी रत्नाकर या कवितांतून बोलतात.

### ५) व्यक्तीचित्रणात्मक कविता:

'हॉटेल माझा देश'मध्ये जसे आत्मचिंतन आलेले आहे. तसे व्यक्ती चित्रणही आलेले आहे. या व्यक्ती हॉटेल कामगार आहेत. ज्यांनी हॉटेललाच आपले सर्वस्व मानले ज्यांनी आपली दु:खे दाबून दुसऱ्यांच्या सेवेचे वृत्त घेतले असे हे सर्व कवी रत्नाकरांचे मित्र, सहकारी आहेत.

एकमेकांच्या सुख, दु:खात मदत करणारे एकमेकांना समजून घेणारे, दिलासा देणारे, प्रोत्साहित करणारे. ही व्यक्ती चित्रणे अस्वस्थ करणारी आहेत. श्रीनिवास, बारक्या, परेश, मूर्ती, मुकेश आदी व्यक्तिचित्रणे ह्या हॉटेलच्या प्रवासात भेटतात.

कष्ट हाच इथला धर्म आहे. जात पात, धर्म संस्कार, एकमेकांना आधार देणाऱ्या ह्या व्यक्ती व्यवस्थेच्या बळी ठरलेल्या आहेत. परिस्थितीच्या रेट्याखाली चिरडलेल्या आहेत. म्हणूनच तर उस्तादची ऑर्डर मिळताच मुकेशचे हात रोटी बनवू लागतात. मुकेशने बनविलेली रोटी खाऊन साहेब आणि सायबीण खुश होतात. मालकाला पैसे मिळतात. मुकेशने गाळलेल्या घामाला मात्र कवडीचेही मोल नसते, की कौतुकाचा एखादा शब्दही नसतो. श्रीमंतांची श्रीमंतीच असते. गरीब हा गरीबच राहतो. तो गरीबीतच संपत जातो. तसाच हा मुकेश सुद्धा रोटी बनवत बनवत 'तंदूरी' भट्टीसारखा हळू हळू रोटीसारखा थंड होऊन संपून जातो.

> ''मुकेश.....
> तंदूरीसारखा थंड थंड होत जाऊन
> रोटीसारखा संपून जातो.''[३७] - (मुकेश)

मुकेशच्या या संपत जाण्याचे कोणालाही दु:ख नसते. हॉटेलमध्ये येणारा मात्र तृप्त होऊन श्रीमंत स्तुती करून जातो. हा असा एकटाच मुकेश नाही, असे अनेक मुकेश तंदूरीसारखे थंड होत असतील व संपून जात असतील. कवीला या स्वतंत्र देशात असे किती मुकेश संपून जाणार याबद्दल या स्वातंत्र्याचा खेद वाटतो. असे हे अनेक मुकेश संपण्याची जबाबदारी कोणाची असा सवाल कवी रत्नाकरांनी केला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाले पण इथला सर्वसामान्य कष्टकरी, कामगार स्वतंत्र झाला का ? या स्वतंत्र देशात ते पुन्हा गुलामीतच जगत आहेत. याबद्दल कवी रत्नाकर खेद व्यक्त करतात.

जरी हा हॉटेल कामगार गुलामीत जगत असला तरी त्यांने आपली माणूसकी सोडलेली नाही. हॉटेल जसे इतरांना जगवण्याचे काम करते तसेच याही व्यक्ती इतरांना आत्मियतेने जवळ घेतात. जगात कुरूपता असली तरी मनाची सुंदरता फार मोठी आहे. श्रीनिवाससारख्या जिवाभावाच्या व्यक्ती इथे आहेत. कवी रत्नाकर म्हणतात या माझ्या मित्रांसाठी मी काहीच करू शकलो नाही. मी नाकर्ता दळभद्री आहे. ज्याने मला आपले केले. ज्याने मला सावरले आधार दिला त्या मित्रांसाठी मी स्टॅपलरमधल्या पिनइतकाही करू शकलो नाही याची कवीच्या मनाला रुकरुक लागलेली आहे. श्रीनिवासने मात्र कधीही अशी अपेक्षा ठेवली नव्हती. तो कवीला म्हणतो,

"तू मेरा भाई है

तू मेरा दोस्त है

तेरे लिए मै कुछभी करूंगा ।

तू ध्यानसे पढाई कर

तेरे लिए

मेरे लिए

दुसरों के लिए"[३८] – (श्रीनिवास)

तू शिक इतरांच्यासाठी आपल्यासाठी असे सांगणारे श्रीनिवाससारखे मित्र फार दुर्मिळ असतात. असे मित्र मित्रांसाठी काहीही करायला तयार असतात. देशाला स्वातंत्र्य मिळून पाच तपे उलटून गेली तरीही या देशात श्रीनिवाससारखी माणूसकी दिसत नाही. याची खंत कवीने या हॉटेलच्या प्रवासात वारंवार व्यक्त केलेली आहे.

हॉटेलमध्ये चाललेल्या नैतिक अध:पतनावरही कवीने बारक्या या कवितेत प्रकाश टाकला आहे.

"बारक्याची छाती

पदर आलेल्या पोरीसारखी झालीय

बारक्यालाही सवय झालीय

याला जबाबदार कोण ?[३९] (बारक्या)

यादीत माझाही चौथा नंबर होता अशी प्रांजळ कबुली देऊन हॉटेलच्या नैतिक अध:पतनाची जबाबदारी स्वीकारून हॉटेलमध्ये काम करणाऱ्या अशा असंख्य बारक्यांचे दु:ख अगतिकता न चाचरता कवी जगाच्या वेशीवर टांगतो. ही नपुसंकतेमागील गलिच्छ मानसिकता पाहून मनाला हादरे बसतात. प्रश्न उरतो की याला जबाबदार कोण ? आपले वैयक्तिक आयुष्य विसरूनही माणसे सार्वत्रिक झालेली असतात. तरीही त्यांच्या वाट्याला अगतिकताच येते. मूर्तीसारखा सेवाभावी कामगार याचे उदाहरण देता येते. सेवा करणे हे आपले आद्य कर्तव्य मानणाऱ्या मूर्तीला या हॉटेलच्या देशात अपमान, शिव्या मानहानी सहन करावी लागते. तरीही तो सेवाभावीपणे काम करतच असतो.

''वेटरको पैसा मिलता है

...... लेकिन इज्जत नही.....

भीमू बारमनची टोचणी

अरे इज्जतको मार गोली

इज्जत किस बाप का नाम है.....?

मूर्तीचे त्वेषी उत्तर !''[४०] – (मूर्ती)

हॉटेल लाईनमध्ये काम करणारा प्रत्येकजण हा अगतिक असतो. तिथे पत, प्रतिष्ठा इज्जत नसते. असते फक्त काम आणि अपमान. म्हणूनच मूर्तीची ही अगतिकता विषण्ण करून सोडते.

स्वत:ला उच्चभ्रू, श्रीमंत समजणाऱ्या लोकांच्या वागण्यातदेखील किती अध:पतीतता आलेली असते. पण श्रीमंतीच्या बुरख्याखाली ते झाकून गेलेले असते. कवी रत्नाकर 'मालकीन' या कवितेत यावर प्रकाश टाकतात.

''मालकीन ड्रायव्हरबरोबर पळून गेली

बातमीची सत्यता पटते.''[४१] – (मालकीन)

मालकीन नोकराबरोबर पळून गेल्याचे आपण वर्तमानपत्रात वाचत असतो याची सत्यता कवी अनुभवतो. जाता, जाता या उच्चभ्रू जगण्याला कशी किड लागलेली आहे, हे जगणे किती पोकळ आहे याचे वास्तव चित्र कवी डोळ्यासमोर उभे करतो.

लक्ष्मीपूरी, डोंबारवाडा, स्टेशनरोड, नायगारा या ओपनगर्मी निर्माण करणाऱ्या संस्था आहेत. इथे सडलेले रोगट कितीतरी जीव जगत असतात. उघड उघड शरीराचा व्यापार चाललेल्या या इलाख्यात पशू पातळीवर शरीरांची भूक भागविली जाते. परेशही या वर्तुळात अडकलेला आहे. याचे कारण कवी देतो,

''परेश तुम शादी क्यों नही करते..... ?

शादी एक ऐसा लड्डू है

जो आदमी खाकरभी रोता है

और न खाकरभी रोता है....''[४२] – (मलई कोप्ता)

लग्न करण्यासाठी स्वत:चे एक घर असावे लागते. समजून घेणारी मायेची माणसे असावी लागतात. आपल्याला ना घर ना दार. आपले कोणी मागेही नाही

आणि पुढेही नाही. मग लग्नाच्या भानगडीतच कशाला पडायचे. हे परेशचे उत्तरच त्याच्या आयुष्याचा पट उलगडते. तेव्हाच कळते की परेश हा ओपनगर्मी निर्माण करणाऱ्या ठिकाणी का जातो त्याची अगतिकता, त्याची मजबूरी त्याला तिकडे खेचत असते. हे यापाठीमागील सत्य आहे.

या हॉटेलच्या प्रवासातील सहप्रवासी म्हणून रत्नाकरांनी आपल्या शब्दसामर्थ्याने या सहकाऱ्यांना वाचकांच्यासमोर गुण दोषांसहित उभा केलेले आहे.

## ६) व्यवस्थेविरोधी राग व्यक्त करणारी कविता:

या कवितासंग्रहात व्यवस्थेविरोधीची चीड काही कवितेत कवी रत्नाकरांनी व्यक्त केलेली आहे. ज्यांनी ही गुलामगिरीची अवस्था निर्माण केली. ज्यांनी सर्वसामान्याला चिरडणारी, भरडणारी, शोषणारी व्यवस्था निर्माण केली. त्या एकूण व्यवस्थेला कवी शिव्या देतो. या देशातील भांडवलदारांनी वर्गवारी रूजविली म्हणून कवी त्या वर्गवारीला शिव्या देतो.

"मी भांडवलदारांना
शिव्या देतो
त्यांनी वर्गवारी रुजविली म्हणून -
मी वर्गवारीला शिव्या देतो."[४३] - (शिव्या)

निव्वळ यांनी वर्गवारी रूजविली नाही तर, माणसामाणसात फूट पाडली. माणसाला शोषता येईल अशी यंत्रना उभी केली. करता येईल तेवढा या सर्वसामान्य माणसांचा, कामगारांचा छळ केला. म्हणून कवीला या व्यवस्थेविरोधी चीड आहे. या व्यवस्थेविरोधीचा संताप कवीने या व्यवस्थेला आणि तिच्या निर्मात्याला शिव्या देऊन व्यक्त केलेला आहे. कामगार वर्गाला मालकांकडून मिळणारा सर्व प्रकारचा त्रास सहन करावा लागतो. मालकाच्या तालावर नाचावे लागते. तो सांगेल तसे करावे लागते. कारण कष्टकऱ्यांच्या पोटाचा प्रश्न असतो. भाकरीवरील भविष्य उडून जाईल याची भीती असते.

"आमच्या घामातून जन्मलेला पैसा
आम्हाला बाप मानत नाही
इथं मोलाचं कष्ट आहे

पण कष्टाला मोल नाही.''[४४] - (अश्रू)

आमच्या घामाचे मोल देऊन निर्माण झालेला पैसा मात्र आमचा कधीच नसतो. त्याच्यावर ऐश करणारे वेगळेच असतात. त्यांना आमचे कष्ट दिसत नाही. त्यांना ह्या कष्टाचे मोलही नसते. म्हणून या वर्गाच्या जगण्याला अर्थच उरलेला नसतो. तो आपले माणूस असणेच हरवलेला आहे. त्याच्या वाट्याला फक्त अश्रूच आहेत आणि म्हणून कवी या व्यवस्थेविरोधी उपरोधाने बोलतो.

हॉटेलमधल्या टॉवेलसारखी समता इथं प्रस्थापित झाली तर, या देशाचे चित्रच बदलून जाईल, कोण उच्च नसेल, कोण कनिष्ठ नसेल. एकूणच या भेदभावाचा लवलेशही नसेल. जात, पात, वर्गवारी सगळी नष्ट होईल.

''वॉश बेसीनच्या स्टील नळीवर लटकणारा
सेवाभावी टॉवेल
आल्या गेल्यांचे तोंड पुसत असतो
निर्मळ मनाने
जात पात न मानता
शोषून घेतो हरेकांची घाण
टॉवेलसारखी माणसं जन्मली
दिशा दिशांत
तर.....?''[४५] - (टॉवेल)

या सेवाभावी टॉवेलसारखी माणसे जन्मली, भेदभाव विसरली तर नक्कीच आपला देश प्रगतीकडे जाईल. असा विश्वास कवी रत्नाकरांनी व्यक्त केला आहे.

**७) देशाभिमान सांगणारी कविता :**

देशाला स्वातंत्र्य मिळून पन्नास-पंच्चावन्न वर्षे झाली. तरी खऱ्या अर्थाने या देशातील माणूस स्वतंत्र झालाच नाही. वाढत चाललेली गुंडगिरी, बेकारी, दारिद्रय या स्वतंत्र देशाला मिटविता आलेले नाही. जात पात, स्पृशास्पृश्यता अजूनही इथून गेली नाही. तिचे वास्तव आणि भयाणक रूप आजही माणसाला माणूस म्हणावयास तयार नाही. दुखणे तेच आहे. त्याचे स्वरूप मात्र बदलते आहे. हे या स्वतंत्र देशाचे दुर्दैव आहे. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या कवीला

याची भयंकर चीड आहे. हॉटेल लाईनमध्ये जपल्या जाणाऱ्या माणूसकीचे सुक्ष्म निरिक्षण करताना आपल्या सामाजिक बांधीलकीची कवीने उत्कटता दाखवून दिलेली आहे.

''हा देश......
जात, धर्म, पंथ यांना
स्तनासारखं जपणारा
हा देश......
हा देश फोडायचा
हॉटिलसारखा आकार द्यायचा''[४६] – (एकात्मता)

संतती नियमांशीच समागम करून विषमतेची पिल्लावळ प्रसवणारा हा देश फोडून समतेचे प्रतीक असलेल्या हॉटिलचे रूप त्याला देण्याचा कवीचा निर्धार आहे.

''किचनरुम...... समतेचं
बाथरुम...... समतेचं
संडास...... समतेचं''[४७] – (एकात्मता)

सारी सारी समता इथे असेल. हॉटिल लाईनमधील, वैफल्यग्रस्तता कवी जितक्या प्रखरतेने व्यक्त करतो. तितक्याच किंबहुना जास्तच प्रखारतेने हॉटिल लाईनमधील कोणाला न जाणवलेल्या सामाजिक समतेला कवी समोर आणतो.

'हॉटेल माझा देश' या शीर्षक कवितेत कवी रत्नाकरांनी या देशातील ढोंगी लोकशाहीवर, व्यभिचारी संस्कृतीवर, एका दिवसापुरत्या खोट्या देशप्रेमावर कोरडे ओढलेले आहेत. तिरंग्यावरील अशोकचक्र ज्यांना ज्यांना शिव्या देत आहे, त्या त्या प्रवृत्ती आज देशभर बळावत चालल्या आहेत. त्यामुळे कवी व्यथित होतो. मात्र या व्यवस्थेत कवी कोणत्याही संप्रदायाला, वादाला, पंथाला बळी पडत नाही. भगवान बुद्धाच्या धम्माचा कवीवर फार मोठा परिणाम झालेला आहे.

''मी कधीच नाही म्हणणार
हा देश माझा म्हणून
अशोक चक्र.... बुद्धांपुरता
शिष्यांपुरता..... तिरंग्यापुरता''[४८] – (हॉटिल माझा देश)

तिरंग्याविषयी कवीच्या मनात नितांत आदर आहे. भगवान बुद्ध, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, यांचा वैचारिक वारसा कवी जपतो. मात्र तो एखाद्या विशिष्ट गटापुरता, संप्रदायापुरता मर्यादित नसून तो सामाजिक अपरिहार्यता म्हणून येतो.

वास्तविक चांगल्यात वाईट शोधणे हा मानवी स्वभावाचा एक भाग बनून राहिलेल्या काळात वाईटातून चांगले शोधण्याची मानसिकता आज विरळच आहे व हे धाडसही सहसा कोण करत नाही. हे धाडस कवी रत्नाकरांच्यात दिसते. अध:पतीत भासणाऱ्या 'हॉटेल लाईन' पासून समतेचा धडा घेऊ पाहणे हा भगवान बुद्धांचा वारसा कवी समर्थपणे वाहतो आहे.

हॉटेल माझा देश या कविता संग्रहांच्याअभ्यासाअंती काही महत्त्वाचे निष्कर्ष हाती लागतात ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) 'हॉटेल माझा देश' हा हॉटेल विश्वावरील मराठी कवितेतील पहिला कवितासंग्रह आहे.

२) कवी रत्नाकरांचा हा पहिलाच कवितासंग्रह असला तरी, त्यात पहिलेपणाच्या खुणा कुठेही जाणवत नाहीत हे या संग्रहाचे खास वैशिष्ट आहे.

३) 'हॉटेल माझा देश' या काव्यसंग्रहातील कविता दलित जाणिवेच्या पलीकडे जाते. तिला पारंपरिक वाङ्मयीन निकष लावून तपासता येत नाही.

४) हा संग्रह कवी रत्नाकरांनी हॉटेलातल्या कामगारांच्या दु:ख, वेदना आणि अगतिकतेला अर्पण करून म. फुले, डॉ. बाबासाहेब यांचाच वारसा पुढे चालविलेला आहे.

५) हॉटेल कामगारांचे दु:ख कवीने समर्थपणे या संग्रहात मांडलेले आहे. त्यांच्या वेदनांचा आलेख या संग्रहातील शब्दाशब्दांतून समोर येतो.

६) हॉटेल लाईनमधील कोणाला न दिसलेल्या, न जाणवलेल्या सामाजिक समतेला रत्नाकरांनी समाजासमोर आणलेले आहे.

७) या संग्रहातील कवितेत ज्या उपमा, प्रतिमा आल्या आहेत. त्या मराठी कवितेला पूर्णपणे नवीन आहेत.

८) या संग्रहातील कविता कामगारांच्या दु:खाला जशी वाचा फोडते तशी ती आत्मनिवेदनही करते.

९) कवी रत्नाकरांनी कोणताही संकोच न ठेवता हॉटेल विश्वातली वास्तवता वाचकांसमोर ठेवलेली आहे.

१०) या काव्यसंग्रहात काही चरित्रपर कविताही आहेत. 'टॉवेल', 'साबण' या सारख्या काही वेगळ्या वस्तूदर्शक वाटणाऱ्या कविताही आशयगर्भ आहेत.

११) ही कविता मुक्त छंदात असली तरी रसभंग कोठेही होत नाही. सौंदर्यापेक्षा आशयाला यात महत्त्व दिलेले आहे.

**समारोप :**

'हॉटेल माझा देश' हा कवितासंग्रह एक आगळे वेगळे हॉटेलचे विश्व घेऊन मराठी कवितेच्या प्रांतात आला. बाहेरुन दिसणारे हॉटेलचे चकमकीत जग आत किती वेदनामय आहे. याचे प्रत्यंतर या संग्रहाने वाचकांना दिले. कामगारांच्यावर होणारे अत्याचार, त्यांचे जगणे हरवलेपण, मालकाचे मालकीपण आणि यंत्रवत काम करणारा भावनाशून्य मनाचा कामगार या सर्वांचे दाहक चित्रण या कवितेच्या माध्यमातून कवी रत्नाकरांनी जगाच्या वेशीवर टांगलेले आहे.

कवी रत्नाकरांचा हा पहिलाच कवितासंग्रह असल्याने अनुभवाचे स्थूल प्रगतिकरण, तरल अनुभवाच्या सौंदर्यपूर्ण आविष्काराचा अभाव, गद्यात्मकता आणि अभिरुचीहीनता यासारखे दोष या संग्रहात आढळतात. असे असले तरी हॉटेल कामगारांच्या वेदनेला शब्द देणारा हा कवितासंग्रह वाचनीय झालेला आहे.

------

## संदर्भ

१. रत्नाकर धम्मपाल : 'हॉटेल माझा देश' सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ.(१९९२), पृ.क्र. ५८.
२. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'प्रमाण', (कविता), पृ.क्र.३१.
३. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'हॉटेल' (कविता), पृ.क्र.१५.
४. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'तक्रार' (कविता), पृ.क्र.३४.
५. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'मेकअप' (कविता), पृ.क्र.३२.
६. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'खून' (कविता), पृ.क्र.४५.
७. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'पुन्हा हॉटेल' (कविता), पृ.क्र.५२.
८. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'संवाद' (कविता), पृ.क्र.६४.
९. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'बातमी' (कविता), पृ.क्र.६१.
१०. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'दोस्त' (कविता), पृ.क्र.१६.
११. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'डेडफोन' (कविता), पृ.क्र.३८.
१२. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'रोज....रोज' (कविता), पृ.क्र.५०.
१३. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'उघडी अंघोळ' (कविता), पृ.क्र.४७.
१४. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'भावना' (कविता), पृ.क्र.४०.
१५. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'चर्चा केंद्र' (कविता), पृ.क्र.३७.
१६. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'कासोटा' (कविता), पृ.क्र.३६.
१७. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'आयुष्य' (कविता), पृ.क्र.६९.
१८. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'प्रेम' (कविता), पृ.क्र.५४.
१९. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'साबण' (कविता), पृ.क्र.४४.
२०. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'चान्स' (कविता), पृ.क्र.२५.
२१. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'नजर कैदी' (कविता), पृ.क्र.२७.
२२. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'कप' (कविता), पृ.क्र.१८.
२३. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'नशा' (कविता), पृ.क्र.४६.
२४. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'फ्रायपॅन' (कविता), पृ.क्र.२४.
२५. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'दिवस' (कविता), पृ.क्र.१७.

२६. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'दम' (कविता), पृ.क्र.२३.
२७. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'आय लव यू' (कविता), पृ.क्र.६५.
२८. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'अपमान' (कविता), पृ.क्र.२०.
२९. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'भेट' (कविता), पृ.क्र.१९.
३०. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'पसंत' (कविता), पृ.क्र.२९.
३१. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'प्रश्न' (कविता), पृ.क्र.३०.
३२. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'कॅशिअर' (कविता), पृ.क्र.५६.
३३. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'सात तारीख' (कविता), पृ.क्र.५७.
३४. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'पुन्हा हॉटेल' (कविता), पृ.क्र.५२.
३५. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'मी' (कविता), पृ.क्र.५३.
३६. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'ॲश-ट्रे' (कविता), पृ.क्र.२२.
३७. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'मुकेश' (कविता), पृ.क्र.३५.
३८. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'श्रीनिवास' (कविता), पृ.क्र.६०.
३९. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'बारक्या' (कविता), पृ.क्र.२६.
४०. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'मूर्ती' (कविता), पृ.क्र.४३.
४१. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'मालकीन' (कविता), पृ.क्र.४९.
४२. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'मलई कोप्ता' (कविता), पृ.क्र.५५.
४३. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'शिव्या' (कविता), पृ.क्र.४२.
४४. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'अश्रू' (कविता), पृ.क्र.२१.
४५. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'टॉवेल' (कविता), पृ.क्र.२८.
४६. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'एकात्मता' (कविता), पृ.क्र.६२.
४७. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'एकात्मता' (कविता), पृ.क्र.६२.
४८. रत्नाकर धम्मपाल : उनि. 'हॉटेल माझा देश....?' (कविता), पृ.क्र.६८.

-----